# डॉ विजय मगदूम यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी संपन्न



**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :** जयसिंगपूर येथील डॉ.जे.जे.मगदूम ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय जे. मगदूम यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमानी ट्रस्ट अंतर्गत साजरा करण्यात आला. एकत्रित कार्यक्रमाचे नियोजन अभियांत्रिकी महाविद्यालया मध्ये करण्यात आले होते .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टच्या व्हॉइस चेअरपर्सन डॉ. सोनाली मगदूम होत्या, उपस्थितांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून कुमार आळीगळे व सौ. बनिता अळींगले डॉ. विजय मगदूम यांना आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होते. कार्यकारी संचालक डॉ.सुनील आडमुठे, डायरेक्टर संदीप रायान्नावार, ॲडव्हायझर डॉ. हरीशआनंद, प्राचार्या डॉ. शुभांगी पाटील व ट्रस्ट अंतर्गत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक सत्कारमूर्तींना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

डॉ. मगदूम फार्मसी कॉलेज कडून वाढदिवसानिमित्त नवीन मतदार नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. तहसिलदार कार्यालय, शिरोळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या सहकार्याने प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारा ठरला.

विशेष म्हणजे, या शिबिराचा मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी लाभ घेतला शिबिराचे उद्घाटन नायब तहसीलदार विनय कौलवकर यांच्या हस्ते झाले, तर महसूल सहाय्यक सचिन झेंडे व त्यांच्या सहकाऱ्यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.

डॉ. मगदूम आयुर्वेदिक महाविद्यालयाकडून मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ.बुद्रुक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून वाढदिवसानिमित्त प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी 'इम्पॅक्ट ऑन स्क्रीन डिपेंडन्सी ऑन स्टुडंट्स' या विषयावरती लेक्चर आयोजित केले होते तसेच रांगोळीचे प्रदर्शन करण्यात आले.

नगरसेवक बजरंग खामकर, रोटरी ग्रीन सिटीचे महेश वाणी, पत्रकार अजित मांगुरकर, टाइम्स ऑफ इंडियाचे श्री चिंतामणी, संभाजी राजे नाईक, मोबीन मुल्ला, नगरसेवक सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार यांनी डॉ. विजय मगदूम यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमामध्ये नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व गेट परीक्षेमध्ये सुयश संपादक केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डी आर माने यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी कार्यकारी संचालक, ॲडव्हायझर, प्राचार्या, प्रबंधक, प्राध्यापक, प्राध्यापक केंत्तर कर्मचारी व विद्यार्थीचे सहकार्य लाभले.


दै.अप्रतिम वॉटस ॲप वर वाचण्यासाठी

**8380911331**

हा नंबर आपल्या वॉटस ॲप ग्रुप ला ॲड करा...